नि.दि.दावा क्र.१०७/२०१०

| MHPU240004872010 | कोंडीभाऊ वाळुंज<br>वि.<br>कृष्णा वाळुंज |
|---|---|

**<u>निशाणी क्र.१०४ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी निशाणी ९९ वर झालेला प्रतिज्ञापत्र डिस्कार्ड चा हुकुम रद्दबातल होवुन मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीने निशाणी क्र. १०८ वर लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हे वादीला त्रास देण्यासाठी दाव्याचे कामकाज लांबवत आहे. प्रतिवादी, साक्षीदार व विधीज्ञ हे न्यायालयात गैरहजर असल्याने साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र रद्द केले आहे. त्यानंतर अनेक तारखा झाल्या आहेत. दिनांक ०४/०७/२०२५ रोजी प्रतिवादीचे प्रतिज्ञापत्र रद्द करुन प्रतिवादीचा पुरावा बंद केला होता. त्यानंतर प्रतिवादीने पुरावा बंद चा आदेश रद्द करुन घेतला आहे. त्यानंतर देखील प्रतिवादीने साक्षीदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र देवून अनेक तारखा झाल्यानंतरही प्रतिवादी व साक्षीदार हे न्यायालयात हजर झाले नाही. अर्जातील कथनास पुरक असे कोणतेही कागदपत्र प्रतिवादीने न्यायालयात दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. उभय पक्षकारातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. उभय पक्षकारातर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे

दिसुन येते की, प्रतिवादींचे तर्फे साक्षीदार क्र. २ सिंधूबाई विष्णू वाळुंज हिचे पुरावा प्रतिज्ञापत्र निशाणी ९९ कडे दिनांक ०१/०८/२०२४ रोजी दाखल केलेले होते. त्यानंतर त्यांना संधी देवूनही त्या न्यायालयात उपस्थित राहिल्या नाहीत. त्यामुळे दिनांक ०६/०३/२०२५ रोजी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र डिस्कार्ड करण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज दिनांक २६/०६/२०२५ रोजी दिलेला आहे. प्रकरण अत्यंत जुने आहे. त्यामुळे प्रतिवादींनी तात्काळ पुरावे देवून दाव्याची अंतीम निर्गती करण्यास प्रयत्न करणे आवश्यक होते. परंतु, अभिलेखावरुन त्यांनी दाव्यास विलंब केल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. अर्जात दिलेले कारण जरी ग्राहय धरले तरी समाधानकारक वाटत नाही. परंतु, न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी अर्ज रक्कम रु. १,२००/- कॉस्ट बसवून मंजूर करणे ऊचित होते.

५. या सर्व बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो-

अर्ज, रक्कम रुपये १,२००/- वादीस कॉस्ट अदा
करण्याच्या अटींवर मंजुर करण्यात येतो.

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2025.11.27 15:50:22 +0530

[अविनाश म. पाटील]

दिनांक : २७/११/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gaurav A. Bobade. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil. |
| | Civil Judge Junior Division, |
| | Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 27/11/2025. |
| Corrected on | : 27/11/2025. |
| Signed on | : 27/11/2025. |